जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

**प्रेसनोट क्रमांक - ८९ दिनांक - ०१/०२/२०२४**

मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर

## १२ वर्षापासून मिसिंग मुलगा कुटूंबिया समवेत सुखरुप...
## आई-वडीलांना अश्रू झाले अनावर

मिसिंग इसम वय ३८ वर्षे,रा.बुलढाणा हा आपले राहते गावी लहान मुलांचे क्लास घेत होता.त्याचे मनामध्ये स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करण्याची इच्छा निर्माण झाली, परंतू आर्थिक परिस्थिती अतिशय हलाखीची व बिकट, अशिक्षित आई-वडील, मोल मजुरी करुन उदरनिर्वाह करीत असल्याने कुटूंबाने अभ्यासा करीता पुणे येथे जाणे करीता विरोध केला. काही दिवस उलटून गेली तरी देखील त्याचे डोक्यातून पुणे येथे जावून अभ्यास करण्याचे खुळ गेले नव्हते. सन २०१२ मध्ये कोणास काही एक न सांगता तो घरातून निघून पुणे येथे आला,पुणे येथे अर्धवेळ (पार्ट टाईम) काम करुन अभ्यास करण्यास सुरवात केली. त्यादरम्यान त्याने महाराष्ट्र लोकसेवा तसेच राज्यसेवा अंतर्गत वेगवेगळया पदाकरीता वेळोवेळी परिक्षा देखील दिल्या. परंतू स्पर्धा परिक्षामध्ये कोणतीही पोस्ट निघत नसल्याने व वारंवार अपयश येत असल्याने त्यास नैराश्य आले. सदर काळामध्ये तो मुंढवा पुणे येथे सन २०१७ पासून भाड्याने राहण्यास होता.

दिनांक १५/१०/२०२३ रोजी सकाळी १०/०० वा.चे सुमारास तो राहते भाड्याचे रुममधून काही एक न सांगता निघून गेल्याने मुंढवा पोलीस ठाणेस मिसिंग तक्रार नोंद केली होती. सदर मिसिंगचे तपासामध्ये तांत्रीक विश्लेषन करुन सदर मुलाचा शोध घेणेस पोलीसांना यश आले. सदर मुलाकडे अधिक चौकशी केली असता सन २०१२ मध्ये मुळगाव काटोडा, ता.चिखली,जि.बुलढाणा येथून कोणास काहीएक न सांगता स्पर्धा परिक्षेकरीता पुणे येथे आलो होतो.परंतू मला स्पर्धा परिक्षेत यश संपादन न झाल्याने नैराश्य आले होते. त्याचे नैराश्य व कुटूंबापासूनचा दुरावा याचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठ पोलीस निरीक्षक,महेश बोळकोटगी यांनी मुलाचे राहतेगावी सरपंच व आई वडील यांना संपर्क करुन माहिती दिली असता प्रथम त्यांचा सदर माहितीवर विश्वास बसला नाही, त्यांनी वारंवार विचारणा करुन शहानिशा केली.तेव्हा त्यांना मुंढवा पोलीस ठाणेस बोलावून घेतले असता,मिसिंग मुलाचे वडील वय ६५ वर्षे,आई वय ५८ वर्षे यांनी त्यांचे मुलास भेटल्यानंतर ऐकमेकांना पाहून डोळ्यातून आनंद अश्रू आले.सदर बाबत काटोडा गावचे सरपंच प्रदीप ढिगळे, वडील,आई व इतर नागरिकांनी पुणे शहर पोलीस दलाचे आभार मानले तसेच पोलीसांचे या तत्पर कामगिरी बद्ल कौतुक केले आहे.

सदरची कामगिरी, मा.पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-५ पुणे शहर, श्री.आर राजा, मा.सहा. पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे शहर श्रीमती अश्विनी राख, यांच्या मार्गदर्शनाखाली, मुंढवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.महेश बोळकोटगी, सहा.पोलीस निरीक्षक,राजू महानोर,पोलीस अंमलदार महेश पाठक,दत्ता जाधव,दिनेश भांदुर्गे,योगेश गायकवाड यांनी केली आहे.